**आरोपी व्ही.सी.द्वारे तळोजा मध्यवर्ती कारागृह, नवी मुंबई येथून हजर .**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

माझे नाव – मीरा कृष्णकांत तोंडवळकर

माझे वय – ४२ वर्षे,

व्यवसाय – गृहिणी

रा. – कोळंब, खडवणनाका, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एच.टी.चव्हाण यांचे मार्फत.</u>**

०१. घटनेच्यावेळेस कोळंब, खडवणनाका येथे मी, माझे पती कृष्णकांत, माझ्या मुली कोमल व कावेरी भाड्याने राहत होतो. माझ्या पतीला दारुचे व्यसन होते. दि.०४/११/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. माझा नवरा दारु पिवून घरी आला व माझ्या बाबांना शिवीगाळी करु लागला. मी माझ्या नवऱ्याला तुम्ही शिवीगाळी का करता याबाबत विचारले. त्यावेळी त्यांनी घरातील लाकडी दांडा घेतला व मला मारण्यासाठी आले. माझ्या पतीने माझे केस पकडून ओढले व माझ्याशी झटापट केली. त्यावेळी माझी मोठी मुलगी कोमल सोडवण्यासाठी आली असताना माझ्या नवऱ्याने त्याच्या हातातील दांड्याने माझी मुलगी कोमल हिच्या डोक्यावरती मारला. त्याने आम्हा दोघींनाही शिवीगाळ करुन ठार मारुन टाकण्याची धमकी दिली व घरातील कोयता घेवून घराच्या बाहेर निघून गेला होता. तो आमच्या जीवाचे बरे वाईट करेल असे वाटल्यामुळे आम्ही पोलीस स्टेशनला जावून तक्रार दिली. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. सदरची फिर्याद मी दिलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. पी१/पी.डब्ल्यू १</u>** दिली आहे. मला ज्या काठीने मारहाण केली होती, ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकते. मला आता जी.एम.आर.क्र. १०/२०२२ वरील लाकडी काठी दाखविण्यात आली. मला मारहाण केलेली काठी हीच आहे. त्यास **<u>एम.ओ.नं.१</u>** दिले आहे. मला मारहाण करणारा इसम दाखविल्यास मी त्याला ओळखू शकते. मला आता आरोपी व्ही.सी.मार्फत दाखविण्यात आला. मारहाण करणारा इसम हाच आहे. घटनेच्या दिवशी संध्याकाळी पंचनामा झाला होता. पंचनाम्यासाठी पेडणेकर

नावाचे पोलीस आले होते. माझी मुलगी कोमलने काठी ओढल्यामुळे काठी तुटली होती आणि काठीचे दोन तुकडे झाल्याबाबत दि.०६/११/२०२१ रोजी मी पोलिसांना माझा जबाब दिला होता. काठी ओढल्यामुळे माझ्या मुलीला तर्जनीला (index finger) दुखापत झाली होती.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.के.जाधव यांचे मार्फत.</u>**

०२. माझे माहेर रेवंडी येथे आहे. दि.२०/०५/२००५ रोजी आरोपी सोबत माझे लग्न झाले होते. माझा व आरोपीचा विवाह ठरवलेला होता. आरोपीचे घर आचरा, त्रिंबक, बगाडवाडी येथे आहे. मी माझ्या सासरी साधारणपणे एक महिना राहीले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यानंतर जोगेश्वरी, मुंबई येथे राहण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्यापूर्वी मला आरोपीची सर्व पार्श्वभुमी माहीती होती. हे म्हणणे खरे आहे की, याबाबत मला माहीती होती की, सन २००० पासून आरोपी लाईट फिटींगचे काम करत होता. आरोपीची जोगेश्वरी, मुंबई येथे स्वतःची खोली होती. त्याठिकाणी मी, माझे पती व माझे दिर संजय तोंडवळकर राहत होतो. माझ्या दिराचा विवाह माझ्या लग्नाच्या अगोदर झालेला होता. जोगेश्वरी, मुंबई येथे साधारणपणे चार ते पाच महीने मी राहिले होते, त्यानंतर मी रेवंडी येथे माझ्या माहेरी राहण्यासाठी आले होते. मी, जानेवारी २००६ मध्ये आचरा येथे माझ्या सासरी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, जानेवारी २००६ मध्ये मी परत आल्यानंतर माझे पती मुंबई वरुन येवून जावून आचरा येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती राहण्यासाठी येत नव्हते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जोगेश्वरी, मुंबई येथे राहत असताना माझे शेजारी राहणाऱ्या लोकांशी भांडण होत होते.

०३. मी बारावी पर्यंत शिक्षण घेतले आहे. पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण ओझर विद्यामंदिर याठिकाणी घेतले आहे. अकरावी व बारावीचे शिक्षण टोपीवाला हायस्कूल याठिकाणी घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी एम.एस.सी.आय.टी व शिवणक्लास केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मला नोकरी करण्यासाठी व शिवणकाम करण्यासाठी सांगत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी काम केले असते तर कुटुंबाला हातभार लागला

असता. माझ्या मुली होत्या, त्यामुळे मी कामाला जावू शकत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही कोळंब, खडवणनाका येथे राहत असल्याबाबत पोलिसांनी कुठलाही पुरावा मागितला नव्हता व मी पोलिसांना तसा कुठलाही पुरावा दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही राहत असलेल्या घरापासून हाकेच्या अंतरावरती मनोज चव्हाण, आशा पराडकर व तुपवडेकर यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचे व्यसन सुटावे यासाठी मी कुठलेही प्रयत्न केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पतीला कुठल्या व्यसन केंद्रामध्ये नेले होते याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. मी साधारणपणे सन २०२१ पर्यंत माझ्या पतीसोबत एकत्र राहत होते.

०४. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझ्या मुलींना पोटगी मिळावी यासाठी मी न्यायालयात पोटगीचे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीविरुध्द पोटगीची रक्कम वसूल होवून मिळण्यासाठी फौ.कि.अर्ज क्र.६८/२०२२ व फौ.कि.अर्ज क्र. ९७/२०२३ दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पतीविरुध्द कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार फौ.कि.अर्ज क्र.९/२०२१ दाखल केलेला आहे. पेडणेकर या पोलिसांशी माझी पूर्वी पासून ओळख नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दारु पिवून येत असल्यामुळे मी त्याच्याविरुध्द घटनेच्या अगोदर पोलीस स्टेशनला तक्रारी दाखल केल्या होत्या व पोलिसांकडून आरोपीला दोन वेळा समज देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, परत वाद झाले तर तुला केसमध्ये अडकवून टाकणार अशी मी आरोपीला धमकी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमचे कुटुंब सामाईकामध्ये एकत्र राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे माझ्या भावजय सोबत संबंध आहेत असे मी आरोपीवरती नेहमी संशय घेत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी संशय घेत असल्यामुळे आरोपी व माझ्यामध्ये भांडण होत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे शेजाऱ्यांशी नेहमी भांडण होत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा मजुरीला जावून कुटुंबाला मदत करत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी लाकडे तोडून स्वयंपाकासाठी घरी घेवून येत होता.

०५. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना आरोपीने काय शिव्या दिल्या ही बाब

फिर्यादीमध्ये देण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, घाणेरड्या शिव्या दिल्या होत्या. शिव्या घाणेरड्या असल्यामुळे मी पोलिसांना शिव्या लिहून दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कुठलीही शिवीगाळ केली नव्हती, त्यामुळे मी फिर्यादीमध्ये शिव्याबाबत कुठलाही उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं.१ प्रमाणे काठी शेतामध्ये व घराच्या आजूबाजूला सहजपणे उपलब्ध होतात. मला काठीची लांबी, रुंदी व वर्णन पोलिसांना जबाब देताना सांगण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनास्थळापासून पोलीस स्टेशन येथे येण्यासाठी वीस मिनीटे लागतात. मला फिर्याद देण्यासाठी का विलंब झाला याबाबत सांगण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्याबाबत मला विचारले नव्हते.

०६. दि.४/११/२०२१ रोजी आम्ही दुपारी १.०० वा पोलीस स्टेशनला पोहोचलो होतो. तेथून आम्हाला लगेचच सरकारी रुग्णालयामध्ये पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी रुग्णालय ते पोलीस स्टेशन यामध्ये दहा मिनीटांचे अंतर आहे. सरकारी रुग्णालयामध्ये ०१.१५ ते ०१.३० च्या दरम्यान पोहोचलो होतो. त्याठिकाणी माझ्या मुलीची तपासणी केली होती. त्याठिकाणी साधारपणे वीस मिनीटे लागली होती. तेथून आम्ही पोलीस स्टेशनला परत आलो. साधारणपणे पंधरा ते वीस मिनीटानंतर पोलिसांनी माझी तक्रार लिहून घेतली होती. संध्याकाळी पंचनाम्याच्यावेळेस पोलिसांशी परत भेट संध्याकाळी ५.४० वा. झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, संतोष सुभाष मुणगेकर हा माझा सख्खा भाऊ आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडे एक रकमी पाच लाख रुपये पोटगी देण्याची मागणी करुन डिवोर्स देण्यासाठी सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला वरील प्रमाणे एक रकमी पोटगीची रक्कम दिली नाही व मला डिवोर्स दिला नव्हता, त्यामुळे मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, समीर निवतकर हा रेवंडी येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्यापूर्वी माझे व समीर निवतकरचे प्रेम संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, मला समीर निवतकरशी विवाह करायचा आहे, आरोपी मला डिवोर्स देत नसल्यामुळे मी त्याला अडकवण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे.

०७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला दारुचे व्यसन होते, दि.०४/११/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. माझा नवरा दारु पिवून घरी आला व माझ्या बाबांना शिवीगाळी करु लागला, मी माझ्या नवऱ्याला तुम्ही शिवीगाळी का करता याबाबत विचारले, त्यावेळी त्यांनी घरातील लाकडी दांडा घेतला व मला मारण्यासाठी आले, माझ्या पतीने माझे केस पकडून ओढले व माझ्याशी झटापट केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी मोठी मुलगी कोमल सोडवण्यासाठी आली असताना माझ्या नवऱ्याने त्याच्या हातातील दांड्याने माझी मुलगी कोमल हिच्या डोक्यावरती मारला, त्याने आम्हा दोघींनाही शिवीगाळ करुन ठार मारुन टाकण्याची धमकी दिली होती, माझ्या मुलीने माझ्या पतीच्या हातातील काठी ओढली होती, त्यामुळे तिच्या हाताला काठी लागली होती हे मी खोटे सांगत आहे. माझ्या पतीने माझे केस पकडून 'ओढले' ही बाब फिर्याद देताना सांगितली होती. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथित घटनेनंतर पोलिसांना भेटण्याचा कधीही योग आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला प्रस्तुत गुन्हयामध्ये अडकवण्यासाठी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस घटनास्थळी आले होते व पंचनामा केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण

ठिकाण : मालवण
दिनांक : ३०/१०/२०२३